# मुंबई विद्यापीठ

मशिमाक/१७ /२०२१—२०२२

परिपत्रक :—

विषय:—विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०२०—२०२१)

सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये/ संस्थाचे प्राचार्य/संचालक यांच्याकडून "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०२०—२०२१) प्रदान करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

सर्व संबधितांना कळविण्यात येते की, "श्रीमती सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या कालखंडात समाजामध्ये स्त्री शिक्षणांची मुहूतमेढ रोवून केलेल्या संस्मरणीय कार्याबददल व त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुंबई विद्यापीठातर्फे सन २००३ या सालापासून विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणा—या महाविद्यालयातील शिक्षिका (एक शहरी व एक ग्रामीण) अशा एकूण दोन आदर्श शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्रदान करून गौरव करण्यात येतो सन २०२०—२०२१ या सालाकरिता सदर पुरस्कारसाठी पात्र शिक्षकांची निवड करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती गठीत करण्यात येणार आहे. विद्यापीठातर्फे निवड होणा—या पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रत्येकी रूपये १०,०००/: रोख व त्यासोबत मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

विद्यापीठाने विविध विभाग/महाविद्यालयीन स्तरावर किमान १५ वर्षे सलग सेवा झालेल्या व विशेष गुणवत्ता, अर्हता प्राप्त केलेल्या आणि अनुभव असलेल्या पात्र शिक्षकाचे आपणाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव विद्यापीठाने गठीत केलेल्या निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थामध्ये क्रियाशिल सहभाग व उल्लेखनिय कामगीरी, व्यक्तीगत स्तरावर केलेल्या कार्याबाबतचे विश्वासार्ह अहवाल, स्त्रियांच्या प्रश्नांवर केलेले अभ्यासपूर्ण संशोधन व उल्लेखनिय लेखन, आर्थिक स्तरावर स्त्रियांना सक्षम करण्यासाठी कलेले प्रयत्न, स्वयरोजगार, प्रशिक्षण , अंगणवाडी, हुंडा निर्मुलन, स्त्री— पुरूष समानता, स्त्री शोषण, जातियता निमुर्लन , सर्वधर्मसमभाव अशा उपक्रमामध्ये क्रियाशील सहभाग अशा गोष्टी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

समितीपुढे विचारार्थ ठेवण्यासाठी आपल्या संस्थेतील जास्तीत—जास्त दोन पात्र शिक्षिकांचे स्वयपुर्ण प्रस्ताव (४ प्रति) त्यांच्या स्वाक्षरीनिशी सोबत जोडलेल्या अ ब आणि क या विवरण पत्रासोबत माहिती भरून आपल्या शिफारशीसह उपकुलसचिव महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग रूम नं. २०४, दुसरा मजला विद्यापीठ मुख्य इमारत , फोर्ट, मुंबई— ४०० ०३२ यांच्याकडे मंगळवार दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यत सादर करावेत त्यानंतर प्रस्ताव स्वीकरले जाणार नाहीत. तसेच अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

आपणास असेही कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराच्या प्रस्तावाबाबत सुचक व अनुमोदक अशादोन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील स्थायी सेवेत असलेल्या शिक्षक कर्मचा—यांच्या स्वाक्ष—या असणे अनिवार्य राहील.त्याप्रमाणे अर्जदाराने प्रपत्रातील विहित रकान्यात आपल्या स्वत:च्या प्रस्तावास संमती असल्याचे जाहीर करणे आवश्यक राहील.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून दयावे. सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळ www.mu.ac.in या लिंकवर उपलब्ध आहे.

(श्री. सुधिर पुराणिक )
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई— ४०० ३२
१७ नोव्हेंबर, २०२१

प्रपत्र 'अ'

"श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०२०—२०२१)

१) शिक्षिकेचे संपूर्ण नाव

२) पत्ता व दूरध्वनी क्रमांक (निवास)

३) सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे/
विद्यापीठ विभागाचे नाव व पत्ता

४) धारण कलेले पद (स्थायी )

५) अध्यापनाचा अनुभव

६) शैक्षणिक अर्हता

७) प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकाचे संपूर्ण
नव पत्ता व दूरध्वनी क्रमांक

८) सूचकाचे महाविद्यालय/विद्यापीठ
नाव व पत्ता व मोहर
प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी

९) प्रस्तावास अनुमोदन देणा—या शिक्षकाचे
नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक

१०) अनुमोदकाचे महाविद्यालय/विद्यापीठ
विभागाचे नाव, पत्ता व मोहर
प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी
मी खाली सही करणार श्रीमती/कुमारी ..................................................................
असे जाहीर करते करते की उपरोक्त माहीती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :—

शिक्षिकेची स्वाक्षरी

श्रीमती/कुमारी ................................ हया आमच्या विभागात ........................................या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो/ करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर प्रस्तावासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी
विभागाचे संचालक / विभाग प्रमुख
महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर

प्रपत्र— 'ब'

| “श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार” (२०२०—२०२१) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | शिक्षकेचे नाव व पदनाव | सध्या सेवेत असलेले ठिकाण | स्थायी सेवेचा कालावधी (प्रमाणपत्रांसहीत ) | विषय | शैक्षणिक पात्रता | गंथ/ लेखन इ (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) प्रती सादर कराव्यात | सहशैक्षणिक उपक्रमातील सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान अ. बाबात सहभाग | समाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्री शोषणा विरूध्द जाणीव आणि जागृती स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इ बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यता प्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/ बक्षिसे | थोडक्यात परिचय स्वतंत्र परिशिष्ट जोडावे |
| | | | | | | | | | | |

दिनांकः—

ठिकाणः—

विद्यापीठाच्या विभागाचे संचालक / विभाग प्रमुख
महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर

प्रपत्र 'क'

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती / कुमारी..............................................................

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाव— प्राध्यापक/ अधिव्याख्याता/ प्रपाठक................................................ यांचा गतइतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.

ठिकाण:—

दिनांक:—

स्वाक्षरी

विभागाचे संचालक / विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व संस्थेची मोहर